# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नो.क्र.२२२३३१/अ.क्र.४४२७/२०२६

श्री. सुरेंद्र पी. गांगण
५०३/बी, धनंजय सीएचएस,
बिल्डिंग नं.६६, बीएमसी शाळेजवळ,
टिळक नगर, चेंबूर, मुंबई-४०००८९.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक, इलाखा शहर
(सा.बां.) विभाग, मुंबई, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग,
(सा.बां.वि.) यांचे कार्यालय, बांधकाम भवन इमारत, २ रा मजला,
२५ मर्झबान रोड, मुंबई – ४००००१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर (सा.बां.) विभाग, मुंबई, कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय,
बांधकाम भवन इमारत, २ रा मजला,
२५ मर्झबान रोड, मुंबई – ४००००१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०६.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ११.०४.२०२२ | ०३.०३.२०२२ | ११.०९.२०२१ | २६.०४.२०२२ |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक ११/०४/२०२२ रोजीच्या जोडपत्रानुसार एकूण १० मुद्यांची माहिती मागितली असून त्यामध्ये तत्कालीन माजी मंत्री श्री.अनिल देशमुख, श्री.संजय राठोड आणि माजी विधानसभा अध्यक्ष श्री.नाना पटोले यांनी मुदतबाह्यपणे ताब्यात ठेवलेल्या सरकारी बंगल्या विषयी माहिती मागितली असून दिनांक ०३/०३/२०२२ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.किरण सोनवणे यांनी याबाबतीत ०१ पृष्ठाची माहिती प्रदान केली असून त्यात अनुक्रमे ज्ञानेश्वरी, क-०८, अ-०९ या बंगल्यापैकी क-०८, अ-०९ या बंगल्यांचा ताबा दिनांक २२/१२/२०१४ व २५/११/२०२० रोजी घेतला असल्याचे नमूद केले व ज्ञानेश्वरी या बंगल्याचा ताबा घेतला नसल्याचे सुचित केले.

तथापि, दिलेली माहिती ही धादांत खोटी असल्याचे नमूद करीत अपिलार्थीनी प्रथम अपील अर्ज दाखल केला असून अपिलार्थीनी त्यांच्या अपील अर्जात मिळालेली माहिती अतिशय विलंबाने मिळाली असून ती त्रोटक व असमाधानकारक असल्याचे तसेच जन माहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांनी या संदर्भात संपूर्ण असहकाराची भूमिका घेतली असल्याचे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. तसेच मागितलेली माहिती ही व्यापक जनहितार्थ असल्याचेही नमूद केलेले आहे. श्री.गांगण यांनी त्यांच्या अर्जात ते हिंदुस्थान टाइम्स या इंग्रजी दैनिकात वरिष्ठ पदावर कार्यरत पत्रकार असल्याचे नमूद केले असून प्रस्तुत प्रकरणी दिनांक १७/०५/२०२२ रोजीच्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जात मागितलेली माहिती ही संवेदनशील तसेच त्रासदायक असल्याची वस्तुस्थिती असल्यामुळे जाणून-बुजून ती नाकारण्यात येत असल्याचे तसेच त्यातील केवळ २ मुद्यांची माहिती देण्यात आली असून उर्वरित ०३ ते १० या मुद्यांची कोणतीच माहिती प्रदान केली नसल्याचे नमूद केले आहे.

आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हजर नसले तरीही मागितलेल्या मुद्यांचे दाखल केलेल्या **जोडपत्र अ** चे अवलोकन केले असता संबंधित माहिती ही **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** अन्वये पूर्णपणे देय असून शासकीय मालमत्ता त्याचे आवंठन, त्याचा ताबा कोणीही ठेवला असल्यास त्या संदर्भात करण्यात आलेली कार्यवाही याबाबतीतील पत्रव्यवहार तथा दस्तऐवज हे तात्काळ उपलब्ध करून देणे हे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य होते व ते त्यांनी नीटपणे बजावले नसल्याचे आढळून येते. तसेच अपिलार्थीनी तत्कालीन अपिलीय अधिकारी श्रीमती मंजुषा म. कुळकर्णी यांनी मे-२०२२ साली दिलेले पत्र हे देखील करण्यात आलेल्या संपूर्ण प्रक्रिये विषयी त्यांनी व्यक्त केलेली उद्विगनता दाखवीत असून त्याची गंभीर दखल घेतली जात आहे. या संदर्भात अपिलार्थीचा दिनांक १७/०५/२०२२ रोजीचा द्वितीय अपील अर्ज पूर्णतः मंजूर करीत अपिलार्थीच्या **जोडपत्र अ** मध्ये नमूद मुद्दा क्रमांक ०१ ते १० या संदर्भातील संपूर्ण माहिती अपिलार्थींना **तात्काळ व विनामूल्य** देण्यात यावी. तसेच यासंदर्भात **कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेल्या नस्तीचे अवलोकनही अपिलार्थींशी संपर्क व समन्वय साधून प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसात प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल क्र.४४२७/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**स्वाक्षरीत/-**

**मुंबई** **( राहुल भा.पांडे )**

**दिनांक : ०१-०६-२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**